श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

कपिल गीता अध्याय(3.31)



वर्णन करने सांख्य योग का, और देने को ज्ञान ।
गुरु रूप में कपिल मुनि थे, देवहूति शिष्य समान।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
तृतीयं स्कंधः
॥ अथ एकत्रिं(म्)शोऽध्यायः ॥

श्रीभगवानुवाच
कर्मणा दैवनेत्रेण, जन्तुर्देहोपपत्तये ।
स्त्रियाः(फ्) प्रविष्ट उदरं(म्), पुं(म्)सो रेतः(ख्) कणाश्रयः ॥ 1॥

श्रीभगवान म्हणतात - जीव मनुष्यशरीरात जन्म घेण्यासाठी भगवंतांच्या प्रेरणेने आपल्या पूर्वकर्मानुसार पुरुषाच्या वीर्यकणाच्या आश्रयाने स्त्रीच्या उदरात प्रवेश करतो.

कललं(न्) त्वेकरात्रेण, पञ्चरात्रेण बुद्बुदम् ।
दशाहेन तु कर्कन्धूः(फ्), पेश्यण्डं(वँ) वा ततः(फ्) परम् ॥ 2॥

तेथे वीर्यकण एका रात्रीत स्त्रीच्या रजामध्ये मिसळून एकरूप बनतो. पाच रात्रीत बुडबुड्यासारखा होतो. दहा दिवसात बोरासारखा थोडासा कठीण होतो. आणि त्यानंतर मांसपेशी किंवा अंडज प्राण्यांमधील अंड्याच्या रूपात त्याचे रूपांतर होते.

मासेन तु शिरो द्वाभ्यां(म्), बाह्वङ्घ्र्याद्यङ्गविग्रहः ।

नखलोमास्थिचर्माणि, लिङ्गच्छिद्रोद्भवस्त्रिभिः ॥ 3॥

एक महिन्यात त्याला डोके उत्पन्न होते, दोन महिन्यात हात, पाय इत्यादी अवयव तयार होतात आणि तीन महिन्यात नखे, रोम, हाडे, चामडे, उत्सर्जक इंद्रिये तसेच अन्य छिद्रे उत्पन्न होतात.

चतुर्भिर्धातवः(स्) सप्त, पञ्चभिः(ह) क्षुत्तृडुद्भवः ।

षड्भिर्जरायुणा वीतः(ङ्), कुक्षौ भ्राम्यति दक्षिणे ॥ 4॥

चार महिन्यात त्यात मांसादी सात धातू उत्पन्न होतात. पाचव्या महिन्यात तहान-भूक लागू लागते आणि सहाव्या महिन्यात पापुद्याने लपेटला जाऊन तो उजव्या कुशीत फिरू लागतो.

मातुर्जग्धान्नपानाद्यै- रेधद्धातुरसम्मते ।

शेते विण्मूत्रयोर्गर्ते, स जन्तुर्जन्तुसम्भवे ॥ 5॥

त्यावेळी मातेने खाल्लेल्या अन्नपाणी इत्यादीपासून त्याच्या शरीरातील सर्व धातू पुष्ट होऊ लागतात आणि तो कृमिकीटकांचे उत्पत्तिस्थान असलेल्या निकृष्ट मल-मूत्राच्या खड्डयात पडून राहातो.

कृमिभिः(ह) क्षतसर्वाङ्गः(स्), सौकुमार्यात्प्रतिक्षणम् ।

मूर्च्छामाप्नोत्युरुक्लेशस्- तत्रत्यैः(ह) क्षुधितैर्मुहुः ॥ 6॥

तो कोमल असतो, म्हणून जेव्हा तेथील भूक लागलेले किडे त्याच्या अंगप्रत्यंगाला टोचे मारू लागतात, तेव्हा अत्यंत क्लेश होऊन तो क्षणोक्षणी मूर्च्छित होतो.

कटुतीक्ष्णोष्णलवण- रूक्षाम्लादिभिरुल्बणैः ।

मातृभुक्तैरुपस्पृष्टः(स्), सर्वाङ्गोत्थितवेदनः ॥ 7॥

मातेने खाल्लेल्या कडवट, तिखट, गरम, खारट, कोरडे, आंबट इत्यादी उग्र पदार्थांच्या स्पर्शाने त्याच्या सर्व शरीराला पीडा होऊ लागते.

उल्बेन संवृतस्तस्मिन्- नन्त्रैश्च बहिरावृतः ।

आस्ते कृत्वा शिरः(ख्) कुक्षौ, भुग्नपृष्ठशिरोधरः ॥ 8॥

तो जीव मातेच्या गर्भाशयात पापुद्याने झाकलेला आणि आंतड्यांनी वेढलेला असतो. त्याचे डोके पोटाकडे आणि पाठ व मान गोलाकार झालेली असते.

अकल्पः(स्) स्वाङ्गचेष्टायां(म्), शकुन्त इव पञ्जरे ।

तत्र लब्धस्मृतिर्दैवात्-कर्मजन्मशतोद्भवम् ।

स्मरन्दीर्घमनुच्छ्वासं(म्), शर्म किं(न्) नाम विन्दते ॥ 9॥

पिंजऱ्यात बंद असलेल्या पक्ष्याप्रमाणे तो पराधीन आणि अवयवांची हालचाल करण्यास असमर्थ असतो. यावेळी अदृष्टामुळे त्याला स्मरणशक्ती प्राप्त होते. तेव्हा आपली शेकडो जन्मातील कर्मे आठवून तो बेचैन होतो. श्वास कोंडलेल्या अवस्थेत त्याला कसली शांती मिळणार?

आरभ्य सप्तमान्मासाल्- लब्धबोधोऽपि वेपितः ।

नैकत्रास्ते सूतिवातैर् -विष्ठाभूरिव सोदरः ॥ 10॥

सातवा महिना सुरू झाल्यानंतर त्याच्यात ज्ञानशक्तीचा उगम होतो, परंतु प्रसूतिवायूच्या हालचालीमुळे तो त्या पोटात उत्पन्न झालेल्या विष्टेतील किड्यांप्रमाणे एका ठिकाणी स्थिर राहू शकत नाही.

नाथमान ऋषिर्भीतः(स्), सप्तवेधिः(ख्) कृताञ्जलिः ।

स्तुवीत तं(वँ) विक्लवया, वाचा येनोदरेऽर्पितः ॥ 11॥

तेव्हा सातधातुमय स्थूल शरीराने बांधलेला तो, देह व आत्मा यांना वेगळेपणाने जाणणारा, भयभीत होऊन दीनवाणीने कृपायाचना करीत हात जोडून, ज्याने त्याला मातेच्या गर्भामध्ये टाकले, त्या प्रभूची स्तुती करतो.

जन्तुरुवाच

तस्योपसन्नमवितुं(ञ्) जगदिच्छयात्त-

नानातनोर्भुवि चलच्चरणारविन्दम् ।

सोऽहं(वँ) व्रजामि शरणं(म्) ह्यकुतोभयं(म्) मे,

येनेदृशी गतिरदर्श्यसतोऽनुरूपा ॥ 12॥

जीव म्हणतो - मी मोठाच अधम आहे. भगवंतांनी मला जी ही गती दाखविली, ती योग्यच आहे. ते आपल्याला शरण आलेल्या या नश्वर जगताचे रक्षण करण्यासाठीच अनेक प्रकारची रूपे धारण करतात. म्हणून मी सुद्धा भूतलावर वावरणाऱ्या त्यांच्या निर्भय चरणांना शरण आलो आहे.

यस्त्वत्र बद्ध इव कर्मभिरावृतात्मा,

भूतेन्द्रियाशयमयीमवलम्ब्य मायाम् ।

आस्ते विशुद्धमविकारमखण्डबोध-

मार्तप्यमानहृदयेऽवसितं(न्) नमामि ॥ 13॥

जो या मातेच्या उदरात देह, इंद्रिये आणि अंतःकरणरूप मायेचा आश्रय घेऊन पुण्य-पापरूप कर्मांनी आच्छादित राहिल्याकारणाने बद्ध असल्यासारखा वाटतो, तोच मी आपल्या संतप्त हृदयामध्ये स्फुरित होणाऱ्या त्या विशुद्ध, अविकारी आणि अखंड बोधस्वरूप परमात्म्याला नमस्कार करतो.

यः(फ्) पञ्चभूतरचिते रहितः(श्) शरीरेच्,

छन्नो यथेन्द्रियगुणार्थचिदात्मकोऽहम्।

तेनाविकुण्ठमहिमानमृषिं(न्) तमेनं(वँ),

वन्दे परं(म्) प्रकृतिपूरुषयोः(फ्) पुमां(म्)सम् ॥ 14॥

जो शरीरापासून वेगळा असूनही पंचभूतात्मक शरीराने बद्ध दिसतो आणि म्हणून इंद्रिये, गुण, शब्दादी विषय आणि अहंकाररूप असा जाणवतो, तोच मी या शरीरादी आवरणाने ज्याचा महिमा कुंठित झाला नाही, अशा प्रकृती आणि पुरुषाचा श्रेष्ठ नियंता असणाऱ्या सर्वज्ञ अशा परमपुरुषाला वंदन करतो.

यन्माययोरुगुणकर्मनिबन्धनेऽस्मिन्,

सां(म्)सारिके पथि चरं(म्)स्तदभिश्रमेण ।

नष्टस्मृतिः(फ्) पुनरयं(म्) प्रवृणीत लोकं(यँ),

युक्त्या कया महदनुग्रहमन्तरेण ॥ 15॥

त्याच्याच मायेने आपल्या स्वरूपाची स्मृती नाहीशी झाल्याकारणाने अनेक प्रकारच्या सत्त्वादी गुण आणि कर्मांच्या बंधनांनी युक्त अशा या संसारमार्गावर निरनिराळे कष्ट झेलीत जो जीव भटकत राहातो, त्याला त्या परमपुरुष परमात्म्याच्या कृपेविना आणखी कोणत्या मार्गाने आपल्या स्वरूपाचे ज्ञान होऊ शकेल बरे?

ज्ञानं(यँ) यदेतददधात्कतमः(स्) स देवस्-

त्रैकालिकं(म्) स्थिरचरेष्वनुवर्तितां(म्)शः ।

तं(ञ्) जीवकर्मपदवीमनुवर्तमाना-

स्तापत्रयोपशमनाय वयं(म्) भजेम ॥ 16॥

मला जे हे त्रिकालज्ञान झाले आहे, तेसुद्धा त्यांच्या शिवाय आणखी कोणी दिले बरे? कारण स्थावर-जंगम सर्व प्राण्याच्या अंतर्यामी तेच अंशरूपाने आहेत. म्हणून कर्मार्जित जीव रूप धारण करणारे आम्ही त्रिविध तापांच्या शांतीसाठी त्यांचेच भजन करीत आहोत.

देह्यन्यदेहविवरे जठराग्निनासृग्-

विण्मूत्रकूपपतितो भृशतप्तदेहः ।

इच्छन्नितो विवसितुं(ङ्) गणयन् स्वमासान्,

निर्वास्यते कृपणधीर्भगवन् कदा नु ॥ 17॥

हा देहधारी जीव दुसऱ्या देहाच्या पोटातील मल, मूत्र आणि रक्ताच्या कुंडात पडलेला आहे, त्या देहातील जठराग्नीने याचे शरीर पोळत आहे. त्यातून बाहेर पडण्याची इच्छा करणारा हा आपले महिने मोजीत आहे. भगवन, आता या दीन जीवाला येथून आपण केव्हा बाहेर काढणार?

येनेदृशीं(ङ्) गतिमसौ दशमास्य ईश,

सं(ङ्)ग्राहितः(फ्) पुरुदयेन भवादृशेन ।

स्वेनैव तुष्यतु कृतेन स दीननाथः(ख्),

को नाम तत्प्रति विनाञ्जलिमस्य कुर्यात् ॥ 18॥

स्वामी, आपण फार दयाळू आहात. आपल्यासारख्या उदार प्रभूने या दहा महिन्यांच्या जीवाला असे उत्कृष्ट ज्ञान दिले आहे. दीनबंधो, या आपण केलेल्या उपकारानेच आपण प्रसन्न व्हा; कारण कोणीही आपल्याला हात जोडण्याखेरीज दुसऱ्या कशाने या उपकाराची परतफेड करू शकेल?

पश्यत्ययं(न्) धिषणया ननु सप्तवर्धिः(श्),

शारीरके दमशरीर्यपरः(स्) स्वदेहे ।

यꣳसृष्टयाऽऽसं(न्) तमहं(म्) पुरुषं(म्) पुराणं(म्),

पꣳश्ये बहिर्हृदि च चैत्यमिवꣳ प्रतीतम् ॥ 19॥

संसारातील हे पशु-पक्षी इत्यादी अन्य जीव तर आपल्या मूढ बुद्धीनुसार आपल्या शरीराला होणाऱ्या सुखदुःखांचाच अनुभव घेतात; परंतु मी तर आपल्या कृपेने शम-दमादी साधनसंपन्न शरीराने युक्त आहे, म्हणून आपण दिलेल्या विवेकी बुद्धीने पुराणपुरुषाचा आपल्या शरीराच्या आत-बाहेर अहंकारयुक्त आत्म्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभव घेत आहे.

सोऽहं(वँ) वसन्नपि विभो बहुदुःखवासं(ङ्),

गर्भान्न निर्जिगमिषे बहिरन्धकूपे ।

यꣳत्रोपयातमुपसर्पति देवमाया,

मिꣳथ्यामतिर्यदनु सं(म्)सृतिचꣳक्रमेतत् ॥ 20॥

भगवन, अत्यंत दुःखाने भरलेल्या या गर्भाशयात मी मोठ्या कष्टानेच राहात आहे; तरीसुद्धा यातून बाहेर निघून संसाररूप अंधाऱ्या विहिरीत पडण्याची माझी इच्छा नाही. कारण तेथे जाणाऱ्या जीवाला आपली माया वेढून टाकते. ज्यामुळे त्याच्या शरीरात अहंबुद्धी निर्माण होते आणि परिणामतः त्याला पुन्हा या संसारचक्रातच पडावे लागते.

तꣳस्मादहं(वँ) विगतविꣳक्लव उꣳद्धरिꣳष्य,

आत्मानमाशु तमसः(स्) सुहृदाऽऽत्मनैव ।

भूयो यथा व्यसनमेतदनेकरन्ध्रं(म्),

मा मे भविꣳष्यदुपसादितविꣳष्णुपादः ॥ 21॥

म्हणून मी व्याकुळता टाकून देऊन हृदयामध्ये भगवान श्रीविष्णूंचे चरण स्थापन करून आपल्या बुद्धीच्या साहाय्याने स्वतःचा अगदी लवकरच या संसारातून उद्धार करून घेईन. ज्यामुळे मला अनेक प्रकारच्या दोषांनी युक्त असे हे संसारदुःख पुन्हा प्राप्त न होवो.

कपिल उवाच

एवं(ङ्) कृतमतिर्गर्भे, दशमास्यः(स्) स्तुवन् नृषिः ।

सद्यः(ह) क्षिपꣳत्यवाचीनं(म्), प्रसूत्यै सूतिमारुतः ॥ 22॥

कपिलदेव म्हणतात - तो दहा महिन्यांचा जीव गर्भातच जेव्हा अशा प्रकारे विवेकसंपन्न होऊन भगवंतांची स्तुती करतो, तेव्हा त्या अधोमुख बालकाला प्रसूतीचे कारण वायू तत्काळ बाहेर येण्यासाठी ढकलून देतो.

तेनावसृꣳष्टः(स्) सहसा, कृꣳत्वावाक् शिर आतुरः ।

विनिष्क्रामति कृच्छ्रेण, निरुच्छ्वासो हतꣳस्मृतिः ॥ 23॥

त्याच्या ताबडतोब ढकलण्याने ते बालक अत्यंत व्याकूळ होऊन खाली डोके करून मोठ्या कष्टाने बाहेर येते. त्यावेळी त्याची श्वासाची गती थांबते आणि त्याची पूर्वस्मृती नष्ट होते.

पतितो भुव्यसृङ्मूत्रे, विष्ठाभूरिव चेष्टते ।

रोरूयति गते ज्ञाने, विपरीतां(ङ्) गतिं(ङ्) गतः ॥ 24॥

मातेच्या रक्त आणि मूत्रात जमिनीवर पडलेले ते बालक विष्टेतील किड्याप्रमाणे तडफडते. त्याचे गर्भवासाच्या वेळचे सर्व ज्ञान नष्ट होते आणि ते देहाभिमानरूप अज्ञान-दशा प्राप्त होऊन वारंवार जोरजोराने रडू लागते

परेच्छन्दं(न्) न विदुषा, पुष्यमाणो जनेन सः ।

अनभिप्रेतमापन्नः(फ्), प्रत्याख्यातुमनीश्वरः ॥ 25॥

नंतर जे लोक त्याचा मनोदय समजू शकत नाहीत, त्यांच्या द्वारा त्याचे पालन-पोषण होते. अशा अवस्थेत त्याला जी प्रतिकूलता प्राप्त होते, तिचा निषेध करण्याची शक्तिसुद्धा त्याच्यात असत नाही.

शायितोऽशुचिपर्यङ्के, जन्तुः(स्) स्वेदजदूषिते ।

नेशः(ख्) कण्डूयनेऽङ्गाना-मासनोत्थानचेष्टने ॥ 26॥

जेव्हा त्या शिशु-अवस्थेतील जीवाला मळकट बाजेवर झोपविले जाते, जेथे ढेकूण इत्यादी स्वेदज जीव चिटकटलेले असतात, तेव्हा त्या शरीराला खाजविणे, उठून बसणे किंवा कुशी बदलण्याचेही सामर्थ्य नसल्याने फार कष्ट होतात.

तुदन्त्यामत्वचं(न्) दं(म्)शा, मशका मत्कुणादयः ।

रुदन्तं(वँ) विगतज्ञानं(ङ्), कृमयः(ख्) कृमिकं(यँ) यथा ॥ 27॥

त्याची त्वचा अतिशय कोमल असते. त्याला ढास, चिलटे आणि ढेकूण असे चावतात की जसे मोठे किडे लहान किड्याला (चावतात). अशा वेळी त्याचे गर्भावस्थेतील सर्व ज्ञान नाहीसे होते आणि ते रडण्याखेरीज दुसरे काही करू शकत नाही.

इत्येवं(म्) शैशवं(म्) भुक्त्वा, दुःखं(म्) पौगण्डमेव च ।

अलब्धाभीप्सितोऽज्ञाना-दिद्धमन्युः(श्) शुचार्पितः ॥ 28॥

अशा प्रकारे कुमार आणि पौगंड अवस्थेतील दुःख भोगून ते बालक युवावस्थेत पोहोचते. यावेळी त्याला इच्छित भोग मिळाले नाहीत, तर अज्ञानाने ते क्रुद्ध होऊन शोकाकुलही होते.

सह देहेन मानेन, वर्धमानेन मन्युना ।

करोति विग्रहं(ङ्) कामी, कामिष्वन्ताय चात्मनः ॥ 29॥

देहाबरोबरच अभिमान आणि क्रोध वाढल्याकारणाने कामाच्या अधीन झालेला तो जीव आपलाच नाश करण्यासाठी दुसऱ्या कामी पुरुषांशी वैर करतो.

भूतैः(फ्) पञ्चभिरारब्धे, देहे देह्यबुधोऽसकृत् ।

अहं(म्) ममेत्यसद्ग्राहः(ख), करोति कुमतिर्मतिम् ॥ 30॥

खोटी बुद्धी धारण करणारा तो अज्ञानी जीव पंचमहाभूतांनी तयार केलेल्या या देहात चुकीच्या समजुतीने नेहमी मी-माझे असा अभिमान धरू लागतो.

तदर्थं(ङ्) कुरुते कर्म, यद्बद्धो याति सं(म्)सृतिम् ।

योऽनुयाति ददत्क्लेश-मविद्याकर्मबन्धनः ॥ 31॥

जे शरीर याला वृद्धावस्था इत्यादी अनेक प्रकारचे कष्ट देते तसेच अविद्या आणि कर्म यांनी बद्ध झाले असल्याकारणाने याचा पिछा सोडीत नाही, त्याच्याचसाठी हा निरनिराळी कर्म करीत राहतो, ज्याच्या बंधनामुळे याला वारंवार संसारचक्रात पडावे लागते.

यद्यसद्धिः(फ्) पथि पुनः(श्), शिश्नोदरकृतोद्यमैः ।

आस्थितो रमते जन्तुस्-तमो विशति पूर्ववत् ॥ 32॥

सन्मार्गाने चालणाऱ्या या जीवाची एखाद्या जिव्हा आणि उपस्थ इंद्रियांच्या भोगात रममाण झालेल्या विषयी पुरुषाशी गाठ पडली आणि हाही त्यात आस्था ठेवून त्याचे अनुकरण करू लागला तर पहिल्याप्रमाणे तो पुन्हा नारकी योनींमध्ये पडतो.

सत्यं(म्) शौचं(न्) दया मौनं(म्), बुद्धिः(श्) श्रीर्ह्रीर्यशः(ह) क्षमा ।

शमो दमो भगश्चेति, यत्सङ्गाद्याति सङ्क्षयम् ॥ 33॥

तेष्वशान्तेषु मूढेषु, खण्डितात्मस्वसाधुषु ।

सङ्गं(न्) न कुर्याच्छोच्येषु, योषित्क्रीडामृगेषु च ॥ 34॥

ज्यांच्या संगतीमुळे सत्य, अंतर्बाह्य पवित्रता, दया, वाणीचा संयम, बुद्धी, धन-संपत्ती, लज्जा, यश, क्षमा, मन आणि इंद्रियांचा संयम, ऐश्वर्य इत्यादी सर्व सद्गुण नष्ट होतात. म्हणून त्या अत्यंत शोचनीय, स्त्रियांच्या हातातील बाहुले बनलेल्या अशांत, मूर्ख आणि आत्मघात करणाऱ्या सत्पुरुषांची संगत कधीच करू नये.

न तथास्य भवेन्मोहो, बन्धश्चान्यप्रसङ्गतः ।

योषित्सङ्गाद्यथा पुं(म्)सो, यथा तत्सङ्गिसङ्गतः ॥ 35॥

कारण या जीवाला जसे स्त्री आणि स्त्रियांच्या संगतीत राहणाऱ्यांशी संगत केल्याने मोह आणि बंधन प्राप्त होते, तसे अन्य कोणाचीही संगत केल्याने होत नाही.

प्रजापतिः(स्) स्वां(न्) दुहितरं(न्), दृष्ट्वा तद्रूपधर्षितः ।

रोहिद्भूतां(म्) सोऽन्वधाव-द्रक्षरूपी हतत्रपः ॥ 36॥

एकदा आपली कन्या सरस्वतीला पाहून ब्रह्मदेवसुद्धा तिच्या रूप-लावण्यावर मोहित झाले होते आणि ती हरिणी होऊन पळत असताना तिच्यामागे निर्लज्जपणे हरीण होऊन धावले.

तत्सृष्टसृष्टसृष्टेषु, को न्वखण्डितधीः(फ्) पुमान् ।

ऋषिं(न्) नारायणमृते, योषिन्मय्येह मायया ॥ 37॥

त्याच ब्रह्मदेवांनी मरीची इत्यादी प्रजापतींची तसेच मरीची इत्यादींनी कश्यप आदी आणि कश्यप आदींनी देव-मनुष्यादी प्राण्यांची सृष्टी (निर्माण) केली, म्हणून यांपैकी एकमेव ऋषिप्रवर नारायण सोडून असा कोणता पुरुष आहे की ज्याची बुद्धी स्त्रीरूपी मायेने मोहित होत नाही.

बलं(म्) मे पश्य मायायाः(स्), स्त्रीमय्या जयिनो दिशाम् ।

या करोति पदाक्रान्तान्, भ्रूविजृम्भेण केवलम् ॥ 38॥

अहो, माझ्या या स्त्रीरूपी मायेचे सामर्थ्य तर पाहा. जी आपल्या नेत्रकटाक्षाने मोठमोठ्या दिग्विजयी वीरांना पायदळी तुडविते.

सङ्गं(न्) न कुर्यात्प्रमदासु जातु,

योगस्य पारं(म्) परमारुरुक्षुः ।

मत्सेवया प्रतिलब्धात्मलाभो,

वदन्ति या निरयद्वारमस्य ॥ 39॥

जो पुरुष योगाच्या उच्च पदावर आरूढ होऊ इच्छितो किंवा ज्याला माझ्या सेवेच्या प्रभावाने आत्मा-अनात्म्याचा विवेक उत्पन्न झाला आहे, त्याने स्त्रियांचा संग कधीही करू नये. कारण स्त्रियांना अशा पुरुषांसाठी नरकाचे उघडलेले दार म्हटले आहे.

योपयाति शनैर्माया, योषिद्देवविनिर्मिता ।

तामीक्षेतात्मनो मृत्युं(न्), तृणैः(ख्) कूपमिवावृतम् ॥ 40॥

भगवंतांनी रचलेली ही स्त्रीरूपिणी माया जेव्हा हळू हळू कोणत्याही निमित्ताने जवळ येते, तेव्हा तिला गवताने झाकलेल्या विहिरीप्रमाणे आपला मृत्यूच समजले पाहिजे.

यां(म्) मन्यते पतिं(म्) मोहान्- मन्मायामृषभायतीम् ।

स्त्रीत्वं(म्) स्त्रीसङ्गतः(फ्) प्राप्तो, वित्तापत्यगृहप्रदम् ॥ 41॥

तामात्मनो विजानीयात्- पत्यपत्यगृहात्मकम् ।

दैवोपसादितं(म्) मृत्युं(म्), मृगयोर्गायनं(यँ) यथा ॥ 42॥

स्त्रीमध्ये आसक्त राहिल्याकारणाने तसेच अंतसमयी स्त्रीचेच चिंतन राहिल्याने जीवाला स्त्रीयोनी प्राप्त होते. अशा प्रकारे स्त्रीयोनीला प्राप्त झालेला जीव पुरुषरूपात असलेल्या माझ्या मायेला धन, पुत्र, घर इत्यादी देणारा आपला पती मानतो. अशा रीतीने जसे शिकाऱ्याचे गाणे हरिणाच्या नाशाला कारणीभूत होते, त्याचप्रमाणे स्त्रीने त्या पुत्र, पती, गृह इत्यादींना विधात्याने आपल्यासाठी निश्चित केलेला मृत्यूच समजावा.

देहेन जीवभूतेन, लोकाल्लोकमनुव्रजन् ।

भुञ्जान एव कर्माणि, करोत्यविरतं(म्) पुमान् ॥ 43॥

जीवाचा उपाधी असणाऱ्या लिंगदेहाने जीव एका लोकातून दुसऱ्या लोकात जातो आणि आपल्या प्रारब्ध कर्मांना भोगीत निरंतर दुसऱ्या देहाच्या प्राप्तीसाठी दुसरी कर्मे करीत राहातो.

जीवो ह्यस्यानुगो देहो, भूतेन्द्रियमनोमयः ।

तन्निरोधोऽस्य मरण- माविर्भावस्तु सम्भवः ॥ 44॥

जीवाचे भूत, इंद्रिये, मनरूप लिंगशरीर (मोक्षापर्यंत) त्याच्यासमवेत राहाते. तसेच कार्यरूप स्थूलशरीर त्याच्या भोगाचे अधिष्ठान आहे. या दोघांनी एकमेकांशी संगठित होऊन कार्य न करणे हाच प्राण्याचा मृत्यू आहे. आणि दोघांनी बरोबर प्रगट होणे यालाच जन्म म्हणतात.

द्रव्योपलब्धिस्थानस्य, द्रव्येक्षायोग्यता यदा ।

तत्पञ्चत्वमहं(म्)माना- दुत्पत्तिर्द्रव्यदर्शनम् ॥ 45॥

पदार्थांच्या उपलब्धीचे स्थान असणाऱ्या या स्थूल शरीरात जेव्हा ते ग्रहण करण्याची योग्यता राहात नाही, ते त्याचे मरण होय आणि हे स्थूलशरीर म्हणजेच मी आहे, अशा अभिमानाने त्याला पाहणे हाच त्याचा जन्म होय.

यथाक्षणोर्द्रव्यावयव- दर्शनायोग्यता यदा ।

तदैव चक्षुषो द्रष्टुर्- द्रष्टृत्वायोग्यतानयोः ॥ 46॥

एखाद्या दोषामुळे जेव्हा डोळ्यांमध्ये रूप इत्यादी पाहाण्याची योग्यता असत नाही, तेव्हा त्यात राहणारे चक्षु-इंद्रियसुद्धा रूप पाहाण्यास असमर्थ होते, आणि जेव्हा डोळे आणि त्यात राहणारे इंद्रिय दोघेही रूप पाहाण्यास असमर्थ होतात, तेव्हा या दोघांचा साक्षी असलेल्या जीवामध्येसुद्धा ती योग्यता राहात नाही.

तस्मान्न कार्यः(स्) सन्त्रासो, न कार्पण्यं(न्) न सम्भ्रमः ।

बुद्ध्वा जीवगतिं(न्) धीरो, मुक्तसङ्गश्चरेदिह ॥ 47॥

सम्यग्दर्शनया बुद्ध्या, योगवैराग्ययुक्तया ।

मायाविरचिते लोके, चरेन्न्यस्य कलेवरम् ॥ 48॥

म्हणून मुमुक्षू पुरुषाला मरणाची भीती, दीनता किंवा मोह असता कामा नये. त्याने जीवाचे स्वरूप जाणून धैर्यपूर्वक निःसंगभावाने येथील व्यवहार करावे. तसेच या मायामय संसारात योग-वैराग्याने युक्त असणाऱ्या सम्यक् ज्ञानमय बुद्धीने शरीर ही ठेव समजून त्याच्याबद्दल अनासक्त राहून व्यवहार करावे.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)

तृतीयस्कन्धेकापिलेयोपाख्याने जीवगतिर्नाम एकत्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥